# समाजकल्याण विभाग
# जिल्हा परिषद,उस्मानाबाद

## सुस्वागतम

# जिल्हा परिषद स्तर

विभागप्रमखाचे  नांव:- चौगुले एन.आर.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,

जिल्हा परिषद उस्मानाबाद

मोबाईल नंबर :- 8330848233

E-mail ID - swozposmanabad2011@gmail.com

# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद



# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

# विभाग परिचय

## समाज कल्याण विभागाअंतर्गत खालील योजना राबविल्या जातात

- दलित वस्ती सुधार योजना, रस्ते, समाज मंदीर, पाणीपुरवठा, नाली, गटार इत्यादी.
- अनुदानित वसतिगृह :- अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदान देणे.
- वृध्द कलाकारांना जिल्हास्तरावरुन कलेची परिक्षा घेऊन मानधनासाठी निवड केली जाते.
- आंतरजातीय विवाह प्रोत्सहानपर योजना:- आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यास अर्थसहाय्य रक्कम रुपये 50000/- दिले जाते.
- 20 टक्के सेस योजना :- जिल्हा परिषद स्वउत्पन्नातून मागासवर्गीय लाभार्थ्यांना विविध योजनेचा लाभ दिला जातो.
- शिष्यवृत्ती :- मागासवर्गीय लाभार्थी इयत्ता 5 वी ते 10 वी च्या विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती दिले जाते. गुणवत्ता शिष्यवृत्ती, सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती, परिक्षा फी, अस्वच्छ शिष्यवृती , मॅट्रीकपूर्व , अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती.
- अपंग लाभार्थ्यांना बीजभांडवल स्वरुपात व्यवसायकरीता अनुदान दिले जाते.
- जिल्हयातील अपंग शाळेतील विदयार्थ्यांना क्रिडास्पर्धा आयोजित केल्या जातात.

# अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकाच्या वस्तीचा विकास करणे योजनेची माहिती

## समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

### अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेची माहिती

**योजनेचा आराखडा-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्र. दवसु-2013/प्र.क्र.85 /अजाक-1 दिनांक 01.08.2013 अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेतंर्गत प्रथमत: दलित वस्ती घोषित कऱणे, वस्त्यांना स्वतंत्र संकेतांक देणे व बृहत आराखडा तयार कऱण्यात आला असून सदर आराखडा सन 2022-23 पर्यंत एकूण 05 वर्षासाठी राहील.

| अ.क्र. | लोकसंख्या | देय रक्कम( रुपये लाखात) |
|---|---|---|
| 1 | 10 ते 25 | 2.00 |
| 2 | 26 ते 50 | 5.00 |
| 3 | 51 ते 100 | 8.00 |
| 4 | 101 ते 150 | 12.00 |
| 5 | 151 ते 300 | 15.00 |
| 6 | 301 च्या पुढे | 20.00 |

**कामांचा प्राधान्यक्रम** - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.दवसु-2011/प्र.क्र.442/अजाक,मुंबई-32 दि.5/12/2011 व नुसार अनूसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजोतंर्गत कामाचा प्राधान्यक्रम खालील प्रमाणे आहे.

1. पाणी पुरवठा
2. मलनिस्सारण
2. नाली बांधकाम
3. पोहच रस्ते

4. अंतर्गत रस्ते
5. समाज मंदीर

**लोकसंख्येच्या प्रमाणात देय निधी :-**

**कामे निवडीबाबत इतर अटी व शर्ती :-**

1. **प्रथम वंचित वस्त्यांना निधी मंजूर करणे.**
2. **त्यानंतर जादा अनुदान देय असणारी वस्ती.**
3. **त्यानंतर एक वेळा अनुदानाचा लाभ दिलेली वस्ती**
4. **त्यनंतर दोन वेळा अनुदानाचा लाभ दिलेली वस्ती**
5. **अजा व नवबौध्दांच्या वस्तीमध्ये पाणी पुरवठयाची कामे मंजुर करताना त्या वस्तीत पाणी पुरवठयाची सोय आहे किंवा नाही या बाबत संबंधित गट विकास अधिकारी यांचा अहवाल मागवुनच कामें मंजुर करणे.**
6. **प्रशासकिय मंजुरी दिलेली कामे 1 वर्षाच्या आत पुर्ण करणे व उपयोगिता प्रमाण पत्र सादर करणे.**
7. **तालुक्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधीचे वाटप करणे.**

**कामे निवडीबाबतचे अधिकार:-**

1. **शासन निर्णय 20/12/2012 नुसार कामे निवडीचे अधिकार अति मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीस होते.**
2. **शासन निर्णय दिनांक 8/03/2016 नुसार कामे निवडीचे अधिकार समाज कल्याण विषय समितीस दिलेले आहेत.**

**निधी वितरण कार्य प्रणाली - निधी वितरण कार्य प्रणाली खालील प्रमाणे आहे.**

1. **कामांच्या प्राधान्यानुसार व लोकसंख्येच्या निकषानुसार प्रस्ताव गट विकास अधिकारी यांचे मार्फत मागवुन घेणे.**
2. **आलेल्या प्रस्तावाची मंजुर बृहत आराखडयानुसार छाननी करणे.**
3. **योजनेस तांत्रिक मान्यता घेणे.**
4. **कामे निवड समितीने निवडलेल्या कामांना प्रशासकीय मंजुरी देणे.**
5. **प्रशासकीय मंजुरी दिलेल्या कामांचा 90 टक्के निधीचे वितरण गट विकास अधिकारी यांचे कडे करणे. सदर निधी गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यामध्ये ठेवावा. गट विकास अधिकारी यांनी काम सूरू कऱण्यापुर्वी 25 टक्के रक्कम अदा करावी. व त्यानंतर कामाचे मुल्यांकन करून त्या प्रमाणात रक्कम अदा करावी. अशा प्रकारे 90 टक्के रक्कम अदा करावी.**

6. **कामे पुर्ण झाल्यानंतर झालेल्या कामांची जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी पाहणी करून 100 टक्के काम पूर्ण झाल्याचे प्रमाणपत्र दिल्यानंतर उर्वरित 10 टक्के निधी ग्रामपंचायतीस अदा करावा.**

7. **पुर्ण झालेल्या कामांचे उपयोगिता प्रमाण पत्रे मागविणे.**

8. **कामे बदलाबाबतचे अधिकार:-** **शासन निर्णय दिनांक 05/12/2011 नुसार निवडलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,यांना आहेत.**

# समाज कल्याण विभाग शिष्यवृत्ती योजनेची माहिती

# अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांचे मुलांना मॅट्रिकपुर्व ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना

**उद्दिष्ट -**

1.अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यासाठी व त्यांना समाज प्रवाहात आणणे कामी सदर शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आलेली आहे.

**अटी व शर्ती -**

1.अस्वच्छ व्यवसायात काम करणारे,अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित सफाईगार,कातडी सोलणे कातडी कमावणे,उघडया नाल्याची सफाई करणे,मैला वाहून नेणे,कचरा(काच,कागद,पत्रा) गोळा करणे,इत्यादी व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तींच्या पाल्यांना अनुज्ञेय.

2.ही शिष्यवृत्ती सर्व जाती धर्माच्या व्यक्तींच्या पाल्यांना अनुज्ञेय,

3.ही योजना केंद्रपुरस्कृत असून यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट लागू नाही.

4.अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना ग्रामिण भागाकरीता ग्रामसेवक व सरपंच,नगरपालिका मुख्याधिकारी,महानगरपालिका आयुक्त/उपायुक्त/प्रभाग अधिकारी यांच्याकडून अस्वच्छ व्यवसाय करीत असलेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

5.अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या पालकांच्या पाल्यांसाठी जातीचा दाखला आवश्यक आहे.

- **प्रक्रिया -**
- अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना मॅट्रिकपुर्व ऑनलाईन शिष्यवृत्ती योजना ही सन 2014-15 पासून ऑनलाईन करण्यात आलेली आहे.
- www.mahaeschol.maharashtra.gov.in ही समाज कल्याण विभागाची अधिकृत वेबसाइट असून ,या वेबसाइट वरच आपल्या शाळेतील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज भरावे.
- ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी आवश्यक लॉगिन आयडी व पासवर्ड जिल्हा समाज कल्याण विभाग जि.प.उस्मानाबाद यांचेकडून प्राप्त करून घ्यावा.
- वेबसाईटवर ऑनलाईन फॉर्म भरल्यानंतर विद्यार्थ्यांची ऑनलाईन यादी,शाळेचा गोषवारा,(हार्ड कॉपीज),आवश्यक ती कागदपत्रे यासह जिल्हा समाज कल्याण विभाग जि.प.उस्मानाबाद यांचेकडे सादर करावा.
- **शिष्यवृत्तीचे स्वरूप -**
- इयत्ता 1 ली ते 10 च्या वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दरमहा रू.110/-(10 महिन्याकरीता) व तदर्थ अनुदान रू.750/- प्रमाणे

वसतीगृहात राहणाऱ्या इ.3 री ते 10 च्या विद्यार्थ्यांना दरमहा रू.700/- (10 महियाकरीता) व तदर्थ अनुदान 1000/-

- **आवेदन छानती समिती**
- गटशिक्षणाधिकारी - - अध्यक्ष
- विस्तार अधिकारी (शिक्षण)- - सदस्य
- 3.जिल्हा समाज कल्याण विभागातील कर्मचारी - (समाज कल्याण निरीक्षक पदापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - सदस्य सचिव
- **संपर्क -**
- संबंधित जिल्हयाचे समाज कल्याण अधिकारी जि.प.उस्मानाबाद
- संबंधित शाळेचे मुख्याध्यापक
- **माध्यमिक शाळेत शिक्षण घेण्या-या मागासवर्गिय विदयार्थ्यांना गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना**
- **उदिष्ट-**
- 1.अनु.जाती व विजाभज व विमाप्र इ.5 वी ते 10 वी मधील शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांना शैक्षणिक प्रगती गुणवत्ता विकास वाढीसाठी दरवर्षी गुणवत्ता शिष्यवृत्ती प्रदान केली जाते.
- 2.अटी **व शर्ती-**
- 1. विदयार्थी हा अनु.जाती विजाभज व विमाप्र प्रवर्गातील असावा.
- 2.मागील वर्षाच्या निकालानुसार इ 5 वी ते 10 वी या वर्गामधील मागील वर्षिक परिक्षेत कमीत कमी 50 टक्के व त्याहून अधिक गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणारा असावा.

- 3. **प्रक्रिया-**
- 1.वार्षिक परिक्षेत कमीत कमी 50 टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होणा-या पहिल्या दोन मागासवर्गिय अनु.जाती व विजाभज विमाप्र विदयार्थ्यांच्या नावाची यादी सर्व माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद या कार्यालयाकडे जूलै अखेर पाठवावीत.
- **4.शिष्यवृत्तीचे स्वरुप-**
- 1.इ 5 वी ते 7 वी -रुपये 500/- प्रमाणे
- 2.इ.8 वी ते 10 वी रुपये 1000/- प्रमाणे
- **5.संपर्क-**
- 1.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
- 2.संबंधित शाळेचे मुख्याध्यापक
- **शिक्षण शुल्क ,परिक्षा शुल्क शिष्यवृत्ती योजना**
- **1.उदिष्ट-**
- 1.अनु.जाती , अनु.जमाती ,व विजाभज व विमाप्र इ 10 वी मधील शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांना शैक्षणिक शुल्काचर प्रतिपूर्ती प्रमाणीत दराने केली जाते.
- **2.अटी व शर्ती-**
- 1. विदयार्थी हा अनु.जाती ,विजाभज, व विमाप्र प्रवर्गातील असावा.
- 2.पालक महाराष्ट्र राज्यातील रहिवाशी असावा .उत्पन्नाची अट नाही .
- 3.विदयार्थी मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणारा असावा.

- 3. **प्रक्रिया-**
- 1अनु.जाती , अनु.जमाती व विजाभज /विमाप्र प्रवर्गातील इ 10 वी मध्ये शिक्षण घेणा-या विदयार्थ्यांच्य नावाची यादी सर्व माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापकांनी संबंधित जिल्हयाचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद यांच्या कार्यालयाकडे न चुकता प्रत्येक वर्षी जूलै अखेर पाठवावेत.
- **4.शिष्यवृत्तीचे स्वरुप-**
- 1.इ 10 वी -रुपये 300/- प्रमाणे
- **5.संपर्क-**
- 1.जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,उस्मानाबाद
- 2.संबंधित शाळेचे मुख्याध्यापक

# समाज कल्याण विभाग

# जिल्हा परिषद उस्मानाबाद

# वसतिगृह विभाग माहिती

**वसतिगृह प्रवेश टक्केवारी.** शासन निर्णय क्रं बीसीएच-2007/प्र.क्र.152/मावक 04 दिनांक 31/10/2008, वसतिगृहामध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे टक्केवारी आहे.

1. अनुसुचित जाती - 70 टक्के
2. अनुसुचित जमाती - 05 टक्के
3. विमुक्त/ भटक्या जमाती - 23 टक्के
4. विशेष मागास प्रवर्ग - 02 टक्के

**वसतिगृह प्रवेशातील प्रवर्ग बदलण्याचे अधिकार -** शासन निर्णय क्र बीसीएच-2007/प्र.क्र.152/मावक 04 दिनांक 31/10/2008 नुसार वरील प्रमाणे नमूद टक्केवारी नुसार प्रवेश न झाल्यास प्रवर्ग बदलुन देण्याचे अधिकार अति मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**परिपोषण अनुदान.** वसतिगृहातील प्रत्येक विद्यार्थ्यांमागे रक्कम रुपये 900 /-दर महा प्रमाणे 10 महियासाठी परिपोषण अनुदान दिले जाते. शासन निर्णय दिनांक 16.03.1998 मधील 8 ई नुसार नुसार 60 टक्के अग्रीम हे माहे जुन मध्ये व 40 टक्के हे माहे जानेवारी अखेर पर्यंत वितरीत करण्याच्या सूचना आहेत.

**वसतिगृहासाठी कर्मचारी आकृतीबंध**

| अ क्र | विद्यार्थी संख्या | अधिक्षक | स्वयपाकी | चौकीदार | सह स्वयपाकी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 24 ते 48 | 01 | 01 | 01 | 0 |
| 2. | 48 च्या पुढील | 01 | 01 | 01 | 01 |

**कर्मचारी मानधन**

1. अधिक्षक - रू 8000/- प्रति महा
2. स्वयपाकी - रू 6000/- प्रति महा
3. चौकीदार - रू 5000/- प्रति महा

## समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद अंतर्गत अनुदानित वसतिगृहाची माहीती

वसतिगृहासाठी जागा

1. एका विद्यार्थ्यासाठी साठी किमान 24 चौरस फुट ते कमाल 40 चौरस फुट
2. अधिक्षकासाठी निवासासाठी कक्ष असणे आवश्यक
3. स्वयपाका साठी स्वंतत्र खोली
4. विदयार्थी प्रमाणात शौचालय व स्नानगृह आवश्यक 5. धान्य स्टॉक रुम आवश्यक

वसतिगृहातील विद्यार्थ्यासाठी आहार.

1. सकाळी नास्ता - पोहे , उपीट अथवा उपलब्धतेनुसार इतर नास्ता
2. दुपारी जेवण - चपाती, भात, वरण व भाजी
5. संध्याकाळचे जेवण - चपाती, भात, वरण व भाजी

वसतिगृहातील विद्यार्थ्यासाठी इतर सोयी सुविधा.

1. स्वंतत्र ग्रंथालय 2. संगणक कक्ष 3. संडास व बाथरूम
4. अभ्यासा साठी स्वतंत्र खोली 5. मनोंरंजन कक्ष 6. क्रिडांगण

वसतिगृह भेंटी व तपासणी मुद्दे

1. तपासणी अधिकारी यांनी वर्षामध्ये किमान 03 भेटी देणे आवश्यक
2. भेटी दौरान विद्यार्थी उपस्थिती कडे लक्ष दयावे.
3. किमान सरासरी उपस्थिती ही मान्य संख्येच्या 75 टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असली पाहीजे.
4. मुलींच्या वसतिगृहावर सायंकाळी 06 च्या नंतर भेट देवु नये.भेट दयावयाची जरूरी असल्यास महिला अधिकारी/कर्मचारी यांना सोबत घेवुन जावे.
5. मुलीच्या आरोग्य तपासणीच्या बाबी कडे लक्ष दयावे.

तपासणी अधिकारी यांनी भेटी मध्ये वरील बाबींचा आढावा घेतला पाहीजे.

वसतिगृह इमारत भाडे अनुदान :- वसतिगृहाच्या इमारत भाडयाबाबत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी दिलेल्या भाडे मुल्यांकन प्रमाणपत्राच्या 75 टक्के अनुदान दिले जाते.

# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद

## वृध्द कलाकार मानधन योजना

वृध्द कलाकार निवड समितीमध्ये अध्यक्ष, चार अशासकीय सदस्य,
(कलाक्षेत्रातील असावेत),

1. समितीची निवड पालकमंत्री करतात, कालावधी तीन वर्ष आहे.
2. मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद सदस्य सचिव.
3. जिल्हा समाज कल्याण अधिकारी व गटविकास अधिकारी हे शासकीय सदस्य .जिल्हा
4. अनुज्ञेय अनुदान अ, ब, क वर्गवारी
5. अ- 2100/- मासिक लाभ
6. ब- 1800/- मासिक लाभ
7. क -1500/- मासिक लाभ
8. लाभार्थी निवडीचे निकष खालील प्रमाणे आहेत.

निवडीचे निकष खालीलप्रमाणे

1. वय 50 वर्षापेक्षा जास्त असावे.
2. उत्पन्न 48,000/- पेक्षा कमी तहसिलदार यांचे प्रमाणपत्र
3. कलावंत 15 वर्ष कलाक्षेत्रात काम केलेले प्रमाणपत्र असावे
4. अपंगाना वयाची अट शिथील करण्यात येते.
5. रहिवाशी प्रमाणपत्र

# समाज कल्याण विभाग

# जिल्हा परिषद उस्मानाबाद

# जिल्हा परिषद सेस योजना.

# जिल्हा परिषद सेस योजना.

जि.प. स्तरावर राबविण्यात येणा-या योजना.  शासन निर्णय क्र ग्रापप्र-१०९३/५४/प्रक्र/ १२३९/३४ अ दिनांक ०१/०९/१९९३ अन्वये  मागासवर्गीयाच्या उन्नतीसाठी २० टक्के राखुन ठेवने आवश्यक.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार मागासवर्गीयासाठी २० टक्के निधी राखून ठेवण्यासाठी  गृहीत धरावयाच्या उत्पन्नाच्या बाबी.

१.  कलम १५७ खाली जिल्हा परिषदेने बसविलेले कर व शुल्क.

२. कमल १५५ (१) नुसार जमीन महसुल उपकरात होणारी वाढ.

३. कलम १४४,१५१ व १५२  १२६ अवये बसविलेला जमीन उपकर.

४. उपकर सापेक्ष अनुदान

५. कलम १५८(३) खाली मिळणारे मुद्रांक शुल्क अनुदान (पंचायतीचा वाटा वगळून).

६. कलम १५० (२), १५१ए (३), व १५२-एक(३) अन्वये देय असलेले पाणी पट्टीवरील उपकरापासूनचे उत्पन्न

## घेण्यात येणा-या योजना.

1. मागासवर्गीयासाठी शेतकऱ्यांना एच डि ई पी पाईप (100%अनुदानावर).
2. मागासवर्गीयासाठी शेतकऱ्यांना 5 एच पी पाणबुडी मोटार वाटप करणे (100%अनुदानावर).

### सन २०१८-१९ मध्ये समाज कल्याण विभागामार्फत ५ टक्के अपंगासाठी राखीव निधीतून व जिल्हा अपंग निधीतून खालील प्रमाणे वैयक्तिक लाभाच्या योजना राबविण्यात येणार आहेत.

1. मतिमंद व्यक्तीना आर्थिक सहाय्य (रू १००००/-मर्यादा).
2. अपंग व्यक्तीना स्वंयरोजगारासाठी झेरॉक्स मशिनसाठी अर्थ  सहाय्य देणेबाबत.
3. अपंग शेतक-यांना एच.डी.पी.ई पाईप / ५ एच.पी.पाणबुडी पुरवठा करणे
4. अपंग विद्यार्थी व अपंग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे
5. अपंगाचे कल्याणार्थ जिल्हा स्तरीय क्रिडा स्पर्धाचे आयोजन
6. अपंग प्रमाण पत्र वितरीत करण्याकरिता विशेष मोहिम शिबीराचे आयोजन करणे
7. अपंग विद्यार्थी व अपंग खेळाडू यांना अर्थसहाय्य देणे
8. सार्वजनिक स्वच्छता, शाळामध्ये मुलीसाठी शौचालये, शाळामध्ये अपंगासाठी विशेष शौचालये

# समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद
# अपंग कल्याण योजना

**समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांचे अधिनस्त असलेल्या अपंग कल्याण कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविधि योजनांची माहिती खालीलप्रमाणे सादर करणेत येत आहे.**

**1.अस्थिविकलांगासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान --**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार अस्थिव्यंग विद्यार्थ्यांना अतीतिव्र अपंगत्वामुळे सामान्य मुलांबरोबर सामान्य शाळेत शिक्षण घेवू शकत नाहीत.अशा अस्थिव्यंग विद्यार्थ्यासाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून अस्थिविकलांग विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा / कार्यशाळा निवासी स्वरूपाच्या असून निवासी शाळेमध्ये भौतिकोउपचार, शिक्षण,निवास,भोजनाची विनामुल्य सोय आहे.

**अटी व शर्ती** 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,
2.फोटो-2,
3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित अस्थिव्यंग शाळा-07 कार्यशाळा-02 अशा एकूण-09 शाळा व कार्यशाळा कार्यरत आहेत. सदरच्या शाळा / कार्यशाळेमध्ये एकुण - 366 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**2.मनोविकलांगासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार मतिमंद,मनोविकलांग अनाथ मतिमंद बालगृह व शाळेतील विद्यार्थी / विद्यार्थिनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा / मतिमंद बालगृहे निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण,निवास,भोजनाची विनामुल्य सोय आहे.

**अटी व शर्ती** 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,
2.फोटो-2,
3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित मतिमंद शाळा-05,मतिमंद अनाथ बालगृहे-02 व कायम स्वरूपी विना अनुदानित -01 अशा एकुण-08 शाळा व बालगृहे कार्यरत आहेत. सदरच्या शाळा / बालगृहामध्ये एकूण- 229 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**3.मुकबधिरासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार मुकबधिर,कर्णबधिर विद्यार्थी / विद्यार्थिंनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण, निवास, भोजनाची विनामुल्य सोय आहे.

**अटी व शर्ती** 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,
2.फोटो-2,
3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित मुकबधिर,कर्णबधिर शाळा-10 कार्यरत आहेत. सदरच्या शाळेमध्ये एकूण - 416 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**4.अंधासाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थांना सहाय्य अनुदान -**

शासन निर्णय क्र.इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2,दिनांक-18 ऑगष्ट,2004 नुसार अंध विद्यार्थी / विद्यार्थिंनीसाठी स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळांमधून विद्यार्थ्यांची शिक्षणांची व पुनर्वसनाची सोय केली आहे.या शाळा निवासी स्वरूपाची असून निवासी शाळेमध्ये शिक्षण, निवास, भोजनाची विनामुल्य सोय आहे.

**अटी व शर्ती** 1.अपंगत्वाचा दाखला 40% पेक्षा जास्त,
2.फोटो-2,
3.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

जिल्हयामध्ये स्वयंसेवी संस्था संचलीत अनुदानित अंध 01 शाळा कार्यरत आहे. सदर शाळेमध्ये एकूण - 54 लाभार्थी लाभ घेत आहेत.

**5.शालांत पुर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची योजना-**

शासन निर्णय क्र.अपंग-2013/प्र.क्र.91/अ.क.2,दिनांक-30 ऑगष्ट,2014 नुसार सामान्य शाळेमध्ये तसेच अपंगांच्या अनिवासी शाळेमध्ये इयत्ता 1 ते 10 पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण इयत्ता 1 ते 4 थी दरमहा रूपये -100/-,इयत्ता 5वी ते 7 वी दरमहा 150/- व इयत्ता 8 वी ते 10 वी दरमहा रू.200/- शिष्यवृत्ती दिली जाते.

**अटी व शर्ती-1अपंगत्वाचा** दाखला (40% पेक्षा जास्त असलेला सिव्हील सर्जन यांचेकडील),
2.मागील वर्षाचे गुणपत्रक,
3.बॅंकेचे पासबुक झेरॉक्स

**6.शालांत परिक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची-**

शासन निर्णय क्र.अपंग-2013/प्र.क्र.91/अ.क.2,दिनांक-30 ऑगष्ट,2014 नुसार इयत्ता 10 वी नंतरचे महाविद्यालयीन, व्यावसयीक,तांत्रीक व अभियंत्रीकी शिक्षणासाठी त्यांच्या अभ्याक्रमांच्या दर्जाप्रमाणे अभ्यास क्रमांचे गट करून दरमहा शिष्यत्तीची रक्कम देण्यात येते.त्याचबरोबर अंध विद्यार्थ्यांना वाचक भत्ता तसेच सर्व अपंग विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीबरोबर शैक्षणिक शुल्क,प्रकल्प टंकलेखन खर्च,अभ्यासदौरा खर्चाची रक्कम दिली जाते.(इ.11 वी व 12 वी प्रथम वर्ष-230 रूपये दरमहा,व्दीतीय व तृतिय वर्ष-300/- दरमहा एम.ए.व इतर व्यवसाईक अभ्यास क्रम-530/- दरमहा )

सदर योजनेचा लाभ घेणेसाठी अपंग विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेमार्फत / कॉलेजमार्फत अर्ज या कार्यालयाकडे सादर करावेत.

**अटी व शर्ती-1.अपंगत्वाचा** दाखला (40% पेक्षा जास्त असलेला सिव्हील सर्जन यांचेकडील),

2.मागील वर्षाचे गुणपत्रक,

3.बॅकेचे पासबुक झेरॉक्स

**7.लघु उद्योगासाठी शरिरीक दृष्टया अपंग व्यक्तींना पुनर्वसनासाठी अर्थसाहय देणे-**

शासन निर्णय क्र.अपंग-2008/प्र.क्र.2008/प्र.क्र.212/सुधार-3,दिनांक-02 जुलै,2010 नुसार 18-50 वर्षे वयोगटातील दृष्टिहीन, कर्णबधिर, अस्थिविकलांग अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी रक्कम रूपये 150,000/- च्या व्यवसायासाठी 80% बँकेमार्फत कर्ज व 20% अथवा कमाल रू.30,000/- अनुदान स्वरूपात दिले जाते.

**अटी व शर्ती-**

1.**अपंगत्वाचा** दाखल,

2.व्यवसायाचे कोटेशन

3.अपंग व्यक्ती करू इच्छित असलेल्या व्यवसायाचे प्रोजेक्ट रिपोर्ट.

4.शाळा सोडलेला दाखला किंवा जन्मतारखेचा दाखला

5.वार्षिक उत्पन्न रू.1,00,000/-पेक्षा कमी असल्याचा तहसिलदार यांचा दाखला,

6.दोन प्रतिष्ठित व्यक्तींची नावे.

7. जागेचा 7/12,8-अ, भाडेपटटा

8.दोन आयकार्ड साईज छायाचित्रे (फोटो),

9.सुवाच्छ व पूर्णपणे भरलेला प्रस्ताव दोन प्रतीत,

10.प्रस्तावावर सुवाच्छ अक्षरात जवळच्या राष्ट्रीयकृत बँकेचे नाव लिहावे.

जिल्हयामध्ये जानेवारी,2016-17 अखेर 21 लाभार्थ्यांनी लाभ देण्यात आलेला आहे.

## 8. अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्याची योजना-

समाजातील अपंगत्व असलेल्या व्यक्तींना सर्वसाधारण व्यक्तीप्रमाणे आपले कौटुंबीक जीवन व्यतीत करता यावे यासाठी अपंग व अपंगत्व नसलेल्या व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन दिल्यास निश्चितपणे अपंग व्यक्तींशी अपंगत्व नसलेल्या व्यक्ती विवाह करण्यास प्रोत्साहीत होते. यासाठी शासन निर्णय क्र. अपंग-2013/प्र.क्र. 103/अ.क्र.2 दिनांक-17 जून 2014 अन्वये अपंग व अव्यंग व्यक्तींच्या विवाहास प्रोत्साहन देण्याच्या योजनेस मंजूरी देण्यात आली आहे.
योजनेची मार्गदर्शक तत्वे/सुचना खालील प्रमाणे आहेत.

**1)** अपंग व अव्यंग विवाहितांना प्रोत्साहन देण्याची ही योजना किमान 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या व्यक्तींशी अपंगत्व नसलेल्या सुदृढ व्यक्तीने विवाह केल्यास त्या जोडण्यास सदर योजना लागू आहे.

**2)** दिनांक 1 एप्रिल 2014 या अर्थीक वर्षापासून नव्याने विवाहित जोडप्यांना सदर योजना लागू होईल.

**3)** किमान 40% किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असलेल्या अपंग वधू किंवा वराने अपंगत्व नसलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास अथवा अपंग नसलेल्या वधू किंवा वराने अपंग असलेल्या वधू किंवा वराशी विवाह केल्यास खालील प्रमाणे अर्थसहाय्य देण्यात येईल

अ) रक्कम रुपये 25,000/- चे बचत प्रमाणपत्र

आ) रक्कम रुपये 20,000/- रोख स्वरुपात

इ) रुपये 4,500/- संसार उपयोगी साहित्य/वस्तू खरेदीसाठी देण्यात येईल.

ई) रुपये 500/- स्वागत समारंभाचा खर्च करण्यासाठी देण्यात येईल.

**4)** <u>सदर योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.</u>

**I)** वधू अथवा वराकडे अपंग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान 40% अथवा त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे.

**II)** अपंग वधू किंवा वर यापैकी एक महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

**III)** विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा. वधू अथवा वर घटस्फोटीत असल्सास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली नसावी.

**IV)** विवाह हा कायदेशीर रित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.

**V)** विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.

## 9. अपंग व्यक्तीना ओळखपत्र देणे

अपंग कल्याण योजनेचा लाभ घेणेसाठी अपंग व्यक्तींना ओळख पत्र देणेत येतात.अपंग व्यक्तीना दिलेल्या ओळख पत्रांचे आधारे एस.टी.प्रवास भाडयाचे अपंग व्यक्तीस 75% व त्याच्या सोबत असणाऱ्या व्यक्तींस 50 % सवलत देणेत येते

सदर योजनेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

1. वैदयकिय प्रमाणपत्र. (मंडळाचे-तीन डॉक्ट्रर यांच्या सहीचे)
2. आधारकार्ड/ रहिवाशी/रेशनकार्ड/ मतदान कार्ड (या पैकी एक)
3. दोन फोटो.
4. वयाचा दाखला

# विषय क्रं. 05

## निरंक

## विषय समितीची रचना व सदस्य

**सभापती**
(श्रीमती चंदकला भिमराव नारायणकर)

अभिमन्यु बाळासाहेब शितोळे
मु.पो.काजळा ता.जि.उस्मानाबाद

कु.सक्षेणा सिद्राम सलगर
मु.पो.तेर ता.जि.उस्मानाबाद

श्रीमती अस्मिता शिवराज कांबळे
मु.पो.अणदुर ता.तुळजापूर जि.उस्मानाबाद

सौ.सोनाली वैभव मुंढे
मु.पो.गोविंदपूर ता.कळंब जि.उस्मानाबाद

श्री. सुरेखा सुरेश यरकल
रा.रामवाडी ता.जि.उस्मानाबाद

श्री. प्रकाश मोतीराम चव्हाण
रा.अलियाबाद ता.तुळजापुर जि.उस्मानाबाद

श्री. जयश्री रामा खंडागळे
रा.दसमेगांव ता. वाशी जि.उस्मानाबाद

श्री. धर्मराज रामचंद्र हिरमुखे
रा.भुसणी ता.उमरगा जि.उस्मानाबाद

श्री. उध्दव रावसाहेब साळवी
रा.तेरखेडा ता.वाशी जि.उस्मानाबाद

श्रीमती अंजली नितिन शेरखाने
रा.बावी ता.जि.उस्मानाबाद

श्रीमती रत्नमाला पंडिराव टेकाळे
रा.पाडोळी ता.कळंब जि.उस्मानाबाद

**सचिव**
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद उस्मानाबाद

विषय समितीची रचना व सदस्यांच्या बैठका

मा.सभापती

(समाज कल्याण विषय समिती जिल्हा परिषद उस्मानाबाद)

सदस्य/सदस्या

बैठका

विषय समितीच्या बैठका दरमहा घेतल्या जातात.

# नाविन्यपुर्ण कार्यक्रम

- सन 2018-2019 या वर्षामध्ये 40 टक्केपेक्षा जास्त असणारे जिल्हयातील अपंग लाभार्थ्यांना व्यवसायाकरीता झेरॉक्स मशिन 100 टक्के अनुदानावर वाटप करण्याची नाविन्यपूर्ण योजना घेण्यात आलेली आहे.
- मतिमंद व्यक्तींना 10000/- रुपये आर्थीक सहाय्य देण्यात येणार आहे.
- अतिथी अपंगाच्या पालकांना 10000/- रुपये आर्थीक सहाय्य देण्यात येणार आहे.

# कलम 2 एच नमुना (अ)

## माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी शासकीय विभागाचे नाव :- समाज कल्याण विभाग ,जिल्हा परिषद, उस्मानाबाद कार्यालय, उस्मानाबाद

## कलम 2 एच नमुना ( a/b/c/d) ( 2018-19)

| अ.क्र. | लोकप्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | समाज कल्याण विभाग ,<br>जिल्हा परिषदउस्मानाबाद | समाज कल्याण विभाग ,<br>जिल्हा परिषदउस्मानाबाद | **जिल्हा परिषद, उस्मानाबाद** |

## कलम 2 एच नमुना (ब)

शासनाकडून पुरेसा निधी प्राप्त लोकप्राधिकारी संस्थाची यादी

शासकीय विभागाचे नाव :- समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद .

## कलम 2 (i) (ii)अंतर्गत ( 2018-19)

| अ.क्र. | लोकप्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण/पत्ता |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | **समाज कल्याण विभाग ,<br>जिल्हा परिषदउस्मानाबाद** | **समाज कल्याण विभाग ,<br>जिल्हा परिषदउस्मानाबाद** | **जिल्हा परिषद, उस्मानाबाद** |

कलम 1 (1) (ब) (i)

# उस्मानाबाद येथील समाज कल्याण कार्यालयातील कार्य व कर्तव्य याचा तपशील

( 2018-19)

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद . |
| पत्ता | समाज कल्याण विभाग , जिल्हा परिषद, उस्मानाबाद . |
| कार्यालय प्रमुख | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद . |
| कोणत्या मंत्रालयातील खात्याचा अधिनस्त | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय मुंबई |
| कार्यक्षेत्र | उस्मानाबाद जिल्हा |
| विशिष्ट कार्य | मागासवर्गिय लाभार्थ्यांची गुणवत्ता / रहाणीमान वाढवणे |
| धोरण | वरीलप्रमाणे |
| सर्व संबंधित कर्मचारी | जिल्हा समाज कल्याण अधिकारी-1,क.प्र.अ-0,स.ले.अ.-1,वै.सा.का-1, स.स.-01,वि.अ.-1,स.क.नि-4,व.स.-1,क.स-1 परिचर-3 वाहनचालक-01 |
| कार्य | मागासवर्गीय लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देणे |
| कामाचे विस्तृत स्वरुप | 1.इ 5 वी ते 10 ची च्या मागासवर्गिय विदयार्थ्यांना व अपंग विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती शिबीराचे आयोजन करणे व पात्र विदयार्थ्यांना ऑनलाईन शिष्यवृत्ती अदा करणे.<br>2. अनुदानित वसतिगृहांना सहाय्यक अनुदाने देण्यात येते.<br>3. 20 टक्के जि.प.सेस अंतर्गत मागासवर्गिय लाभार्थ्यांना दर वर्षी वैयक्तीक लाभाच्या योजना राबविल्या जातात.<br>4. आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अर्थसहायअंतर्गत मागासवर्गिय जोडप्यांना लाभ देण्यात येतो.<br>5.अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांचा विकास दलित वस्ती सुधार योजना अर्तर्गत जिल्हयातील मागासवर्गिय वस्तीमध्ये नाल्या,डांबरी रस्ते तसेच समाज मंदीर ,स्मशानभुमी इ साठी निधी दिला जातो.<br>6. अपंग बिज भांडवल अपंग व अव्यंग विवाह अपंग ओळखपत्र तसेच अपंग विदयार्थ्यांसाठी निवाशी शाळा चालवल्या जातात. |
| मालमत्तेचा तपशील | इमारत जिल्हा परिषदेच्या मालकीची आहे. |
| उपलब्ध सेवा | वरील प्रमाणे |
| संस्थेच्या संरनात्मक तक्त्यामध्ये प्रत्येक स्तरावरचा तपशील | - |
| कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळा | 02472/227649 |
| साप्ताहीक सुट्टी व विशिष्ट | प्रत्येक रविवार , महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार वगळता सकाळी 10.00 ते 5.45 |

| सेवेसाठी ठरविलेल्या वेळा | सकाळी 10.00 ते 5.45 |
| --- | --- |
| कार्यालयाचे प्रारुप व तक्ता | |

↓

जिल्हा समाज कल्याण अधिकारी

↓

कनिष्ठ प्रशासन अधिकारी

सहाय्यक लेखा अधिकारी

↓

वैदयकीय सामाजिक कार्यकर्ता

विस्तार अधिकारी

↓

समाज कल्याण निरीक्षक

वरिष्ठ सहाय्यक

↓

कनिष्ठ सहाय्यक

↓

चालक

↓

परिचर

## कलम 4 (1) (ब) (ii) नमुना (ब)

## उस्मानाबाद येथील समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील ( 2018-19)

| अ. क्र. | पदनाम | अधिकार -आर्थिक | कोणत्या कायद्या/नियम/शासन निर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद | समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद | शासन निर्णयानुसार | निरंक |

**कलम 4 (1) (ब) (ii) नमुना (अ)**

**उस्मानाबाद येथील समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, उस्मानाबाद कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील ब ( 2018-19)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार -प्रशासकीय | कोणत्या कायद्या/नियम/शासन निर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | अहरण व संवितरण अधिकारी | शासन निर्णयानूसार | |
| 2 | कार्यालयीन अधिक्षक | कार्यालयीन कर्मचा-यावर नियंत्रण ठेवणे. व जन माहिती अधिकारी | शासन निर्णयानूसार | |
| 3 | सहाय्यक लेखा अधिकारी | तरतूद नियंत्रण अंदाज पत्रक तयार करणे | शासन निर्णयानूसार | |
| 4 | वै.सा.का | अपंग शाळा कर्मचाऱ्यांचे वेतन देयके व इतर देयके अपंग शाळांना भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 5 | सहाय्यक सल्लागार | अपंग आळखपत्रे देणे व अपंग शाळां संदर्भात इतर माहिती | शासन निर्णयानूसार | |
| 6 | विस्तार अधिकारी | वसतिगृहा संदर्भात नियंत्रण व वसतीगृहास भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 7 | स.क.नि | कार्यालयीन कामकाज सांभाळुन दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत कामांना व आश्रमशाळांना भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 8 | व.स | कार्यालयीन कामकाज | शासन निर्णयानूसार | |
| 9 | क.स | कार्यालयीन कामकाज | शासन निर्णयानूसार | |
| 10 | परिचर | कार्यालयीन कामकाज | | |

**कलम 4 (1) (ब) (ii) नमुना (ब)**

**उस्मानाबाद येथील समाज कल्याण विभाग  कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकाराचा**

**तपशील क ( 2018-19)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार - फौजदारी | कोणत्या कायद्या/ नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | जिल्हा समाज कल्याणअधिकारी जिल्हा परिषद उस्मानाबाद | निरंक | निरंक | निरंक |

**कलम 4 (1) (ब) (ii) नमुना (ब)**

**उस्मानाबाद येथील समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकाराचा**

**तपशील ड ( 2018-19)**

| अ. क्र. | पदनाम | अधिकार -अर्धन्यायीक | कोणत्या कायद्या/ नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद | अपंग शाळा व अनु.वसतिगृहांवर नियंत्रण ठेवणे | शासन निर्णयानूसार | |

**कलम 4 (1) (ब) (ii) नमुना (ब)**

**उस्मानाबाद येथील समाज कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकाराचा**

**तपशील ( 2018-19)**

| अ. क्र. | पदनाम | कर्तव्या | कोणत्या कायद्या/ नियम/ शासन निर्णय/ परिपत्रकानुसार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | अहरण व संवितरण अधिकारी | शासन निर्णयानूसार | |
| 2 | कार्यालयीन अधिक्षक | कार्यालयीन कर्मचा-यावर नियंत्रण ठेवणे. व जन माहिती अधिकारी | शासन निर्णयानूसार | |
| 3 | सहाय्यक लेखा अधिकारी | तरतूद नियंत्रण अंदाज पत्रक तयार करणे | शासन निर्णयानूसार | |
| 4 | वै.सा.का | अपंग शाळा कर्मचाऱ्यांचे वेतन देयके व इतर देयके अपंग शाळांना भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 5 | सहाय्यक सल्लागार | अपंग आळखपत्रे देणे व अपंग शाळां संदर्भात इतर माहिती | शासन निर्णयानूसार | |
| 6 | विस्तार अधिकारी | वसतिगृहा संदर्भात नियंत्रण व वसतीगृहास भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 7 | स.क.नि | कार्यालयीन कामकाज सांभाळुन दलीत वस्ती सुधार योजने अंतर्गत कामांना व आश्रमशाळांना भेटी देणे | शासन निर्णयानूसार | |
| 8 | व.स | कार्यालयीन कामकाज | शासन निर्णयानूसार | |
| 9 | क.स | कार्यालयीन कामकाज | शासन निर्णयानूसार | |
| 10 | परिचर | कार्यालयीन कामकाज | | |

## कलम 4 (1) (ब) (iii)
## निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदाईत्व करुन कार्यपध्दतीचे प्रकाशन

| **कामचा प्रकार /नाव** | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | अपंग शाळांची प्रकरणे / आश्रम शाळांची प्रकरणे / अनुदानीत वसतीगृहांची प्रकरणे |
| संबंधित तरतुद | अपंग शाळांतील / आश्रम शाळांतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देणे. |
| अधिनियमाचे नाव | |
| नियम | |
| शासन निर्णय | |
| परिपत्रक | |

**कार्यालयीन आदेश**

| अ. क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | अनुदानित वसतीगृहांना अनुदाने देणे | अर्ध न्यायीक असल्याने निश्चित कालावधी नाही प्रकरण प्राप्त झाल्यावर 7 दिवसात कार्यवाही सुरु करणे. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |
| 2. | अपंग निवाशी शाळांना अनुदाने देणे | अर्ध न्यायीक असल्याने निश्चित कालावधी नाही प्रकरण प्राप्त झाल्यावर 7 दिवसात कार्यवाही सुरु करणे. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |
| 3. | 20 टक्के जि.प.सेस योजना | अर्ध न्यायीक असल्याने निश्चित कालावधी नाही प्रकरण प्राप्त झाल्यावर दरमहा कार्यवाही सुरु करणे | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |
| 4. | इ 5 वी ते 10 वी च्या मागासवर्गिय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती | अर्ध न्यायीक असल्याने निश्चित कालावधी नाही प्रकरण प्राप्त झाल्यावर व तरतुद प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करणे. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |
| 5. | अपंग शाळांचे वैदयकीय प्रतिपूर्ती देयके | अर्ध न्यायीक असल्याने निश्चित कालावधी नाही प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर 7 दिवसाच्या आत कार्यवाही सुरु करणे . | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |

| कामाचा प्रकार /नाव | |
|---|---|
| कामाचे स्वरुप | अपंग निवाशी शाळा व वसतिगृहे यांची देयके |
| संबंधित तरतुद | निरंक |
| अधिनियमाचे नाव | शासन निर्णयानूसार |
| नियम | शासन निर्णयानूसार |
| शासन निर्णय | |
| परिपत्रक | |

# कार्यालयीन आदेश

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | इ 5 वी ते 10 वी च्या मागासवर्गिय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे | वैयक्तीक मान्यता शिबीराचे आयोजन ऑगस्ट, ऑक्टोबर या महिन्यात आयोजित करण्यात येते | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | कालावधी दिवस | कामासाठी जबाबदार अधिकारी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | अनु.वसतिगृहे व अपंग निवाशी शाळा यांचे सर्व कामे | पूर्ण कागदपत्र प्राप्त झाल्यानंतर एक महिना | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | |

**कलम 4 (1) (ब) (iv) नमुना (अ)**

**समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद यांचे कार्यालयातील भौतिक व आर्थिक निकष ( 2018-19)**

| अ.क्र | पदाचे नाव | उपक्रम | भौतिक लक्ष | आर्थिक लक्ष | कालमर्यादा | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | इ 5 वी ते 10 वी च्या मागासवर्गिय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती देणे | प्राप्त प्रस्तावानुसार | विहीत नियमानुसार | 1 वर्षे एप्रिल ते मार्च | |
| 2. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | अनु.वसतिगृहे व अपंग निवाशी शाळा यांचे सर्व कामे | शासन धोरणानुसार मूल्यांकनानुसार पात्र शाळेचे प्रस्तावानुसार | शासन धोरणानुसार व विहीत नियमानुसार | 1 वर्षे एप्रिल ते मार्च | |
| 3. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | कार्यालयीन कामकाज व वरिष्ठांच्या बैठका | शासन धोरणानुसार | निरंक | 1 वर्षे एप्रिल ते मार्च | |

## कलम 4 (1) (ब) (v) नमुना (अ)
## कामाशी संबंधित नियम /अधिनियम

| अ.क्र. | शासन निर्णयानुसार दिलेले विषय | शासन निर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1. | अनुदानित वसतीगृहांना अनुदाने देणे | शासन निर्णयानूसार | |
| 2. | अपंग निवाशी शाळांना अनुदाने देणे | शासन निर्णयानूसार | |
| 3. | 20 टक्के जि.प.सेस योजना | शासन निर्णयानूसार | |
| 4. | इ 5 वी ते 10 वी च्या मागासवर्गिय विदयार्थ्यांना शिष्यवृत्ती | शासन निर्णयानूसार | |
| 5. | अपंग शाळांचे वैदयकीय प्रतिपूर्ती देयके | शासन निर्णयानूसार | |

## कलम 4 (1) (ब) (viii) नमुना (अ)
## समाज कल्याण  कार्यालय उस्मानाबाद येथील समाज कल्याण कार्यालयामधील मंडळे/परिषदा समिती त्याचे प्रपत्र
( 2018-19)

| **अ.क्र.** | **समिती मंडळाचे नाव** | **समितीचे /मंडळाचे परिषदेची संरचना** | **समितीचे मंडळाची उद्दिष्ट** | **सभेचे कामकाज** | **सभा जन सामान्यासाठी खुली आहे किंवा नाही** | **सभेचे कार्यवृत्तांत (उपलब्ध)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **निरंक** | | | | | | |

## कलम 4 (1) (अ) (ix)

## समाज कल्याण कार्यालय उस्मानाबाद येथील कार्यालयामधील अधिकारी व कर्मचारी यांचे नाव, पत्ता व त्यांचे मासिक वेतन ( 2018-19)

| अ.क्र | पदनाम | अधिकारी /कर्मचारी यांचे नाव | वर्ग | रूजू दिनांक | दुरध्वनी क्रमांक फॅक्स क्रमांक ईमेल | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | श्री.एन.आर.चौगुले | 1 | 29.11.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 53852/- |
| 2 | कार्यालयीन अधिक्षक | श्री.कांबळे के.आर. | 3 | 10.01.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 45140/- |
| 3 | सहायक लेखा अधिकारी | श्री जाधव पी.एम | 3 | 01.07.2016 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 57057/- |
| 4 | विस्तार अधिकारी | श्री इंगळे पी.एस | 3 | 04.07.2014 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 47600/- |
| 5 | समाज कल्याण निरीक्षक | श्री माने डी.व्ही | 3 | 17.10.2014 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 32245/- |
| 6 | समाज कल्याण निरीक्षक | श्रीम.भोसले एस.के | 3 | 30.09.2015 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 38273/- |
| 7 | समाज कल्याण निरीक्षक | श्री शिंदे एन.डी | 3 | 28.04.2017 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 35036/- |
| 8 | समाज कल्याण निरीक्षक | शिंदे एम.एस | 3 | 05.11.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 39888/- |
| 9 | समाज कल्याण निरीक्षक | रिक्त | 3 | | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | |
| 10 | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता | श्रीम.कांबळे एस.बी. | 3 | 30.08.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 45130/- |
| 11 | सहा.सल्लागार | श्री शिंदे एस.एम | 3 | 26.06.2001 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 55507/- |
| 12 | वरीष्ठ सहायक | रिक्त. | 3 | | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | |
| 13 | वरीष्ठ सहायक | श्री नाईकवाडी व्ही.पी | 3 | 03.07.2015 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 35808/- |
| 14 | कनिष्ठ सहायक | श्री भिसे बी.डी | 3 | 16.08.2014 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 29782/- |
| 15 | परिचर | श्री कुलकर्णी बी.यु | 4 | 15.06.2007 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 32026/- |
| 16 | परिचर | श्रीम.दिक्षीत एस.बी. | 4 | 29.09.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 18299/- |
| 17 | परिचर | श्रीम.सुरवसे आर.पी. | 4 | 10.12.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 32450/- |
| 18 | वाहनचालक | श्री.खान एफ.एस | 4 | 18.06.2018 | 02472-227649 swozposmanabad2011@gmail.com | 42402/- |

## कलम 4 (1) (अ) (vi)

## समाज कल्याण कार्यालय उस्मानाबाद येथील कार्यालयामधील उपलब्ध दस्ताऐवजाची वर्गवारी

| अ.क्र | विषय | दस्ताऐवजाचा प्रकार नस्ती/व्हावचर इ. | प्रमुख बाबीचा तपशील | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1. | कर्मचा-याचे मुळ सेवा पुस्तिका व वैयक्तीक मान्यता संचिका व अनुदान वाटप संचिका | अ वर्ग संचिका | नोंदवही ठेवण्यात आली आहे. | कायम स्वरुपी |
| | वेतनेत्तर अनुदान संचिका | ब वर्ग संचिका | - | 30 वर्षे |
| | शिष्यवृत्ती प्रस्ताव व देयके व सेस योजनेचे प्रस्ताव व वैद्यकीय प्रतिपूर्ती संचिका | क वर्ग संचिका | - | 15 वर्षे |
| | आस्थापना विषयक संकीर्ण | ड वर्ग संचिका | - | 1 वर्ष |

## कलम 4 (1) (ब) (vii)

## समाज कल्याण कार्यालय उस्मानाबाद येथील कार्यालयामध्ये परिणामकारक कामासाठी जन सामान्याशी सल्ला मसलत करण्याची व्यवस्था

| अ.क्र. | सल्ला मसलतीचा विषय | कार्य प्रणालीचे वर्णन | कोणत्या अधिनियमानुसार /परिपत्रकानुसार | पुनर्रावृत्ती कल |
|---|---|---|---|---|
| निरंक | | | | |

## कलम 4 (1) (ब) (xvi)

## उस्मानाबाद येथील समाज कल्याण जिल्हा परिषद उस्मानाबाद कार्यालयातील शासकीय माहिती अधिकारी/सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी /अपिलीय अधिकारी

### अ-शासकीय माहिती अधिकारी ( 2018-19)

| अ. क्र. | शासकीय माहिती अधिका-याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता फोन | ई-मेल | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.कांबळे के आर | क.प्र.अ | उस्मानाबाद जिल्हा | जि.प.उस्मानाबाद 02472-227649 | Swozposmanabad2011@Gmail.Com | जिल्हा समाज कल्याण अधिकारी |

### ब - सहाय्यक शासकीय माहिती अधिकारी (2018-19)

| अ. क्र. | सहाय्यक शासकीय माहिती अधिका-याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता फोन | ई-मेल | शासकिय माहिती अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.इंगळे पी.एस | विस्तार अधिकारी | उस्मानाबाद जिल्हा | समाज कल्याण जि.प.उस्मानाबाद 02472-227649 | Swozposmanabad2011@Gmail.Com | कनिष्ठ प्रशासन अधिकारी |

## क-अपिलीय शासकीय माहिती अधिकारी ( 2018-19)

| अ. क्र. | शासकीय माहिती अधिका-याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता फोन | ई-मेल | यांच्या अधिनिस्त अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | श्री.एन.आर. चौगुले | जिल्हा समाज कल्याण अधिकारी | उस्मानाबाद जिल्हा | समाज कल्याण जि.प.उस्मानाबाद 02472- 227649 | Swozposmanabad2011@Gmail.Com | शासकिय माहिती अधिकारी |

दिनांक :- 07 / 01/2019

# प्रमाणपत्र

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील प्रकरण 2 नियम 4 नुसार समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद यांची पेनड्राईव्हमधील माहिती तपासली असून ती बरोबर आहे.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी
जिल्हा परिषद उस्मानाबाद